# 'युआंडा-रॉयल कॉन्सोर्टियम' उभारणार मेट्रोचे सरकते जिने

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन अंतर्गत आरे डेपो ते दादर दरम्यान एकूण १३ स्थानकांमध्ये सरकत्या जिन्यांची यंत्रणा उभारण्यासाठी युआंडा- रॉयल कॉन्सोर्टियम या समूहाची निवड करण्यात आली आहे. ही निवड आंतरराष्ट्रीय निविदा प्रक्रियेद्वारे जायकाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार करण्यात आली आहे.

युआंडा- रॉयल कॉन्सोर्टियम हे कंत्राटदार मेट्रो-३ च्या १३ स्थानकांच्या १७६ सरकत्या जिन्यांचे आरेखन, उत्पादन, पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कमिशनिंग अशा प्रकारची कामे करणार आहेत.

सर्वात जास्त प्रमाणात प्रवासी वाहून नेण्याची क्षमता, ऊर्जाबचत करणारे रिजनॅरेटिव्ह ड्राइव्ह, रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन अशा कामांसाठी सरकत्या जिन्यांचे आरेखन करण्यात येणार आहे, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.